जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2 OCT 2018
लोकमत

# गांधी छायाचित्र प्रदर्शन प्रेरणादायी

## देवानंद शिंदे : 'मोहनदास ते महात्मा चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन; ६ ऑक्टोबरपर्यंत खुले

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** महात्मा गांधींचे दक्षिण आफ्रिकेतील वास्तव्य या छायाचित्र प्रदर्शनामुळे इतिहासापासून वर्तमान उज्ज्वल करण्याची प्रेरणा आजच्या तरुणांना मिळेल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी सोमवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या गांधी अभ्यास केंद्राच्या वतीने दसरा चौकातील शाहू स्मारक भवनाच्या प्रदर्शनगृहात महात्मा गांधी यांच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जयंती वर्षानिमित्त त्यांच्या दक्षिण आफ्रिकेतील वास्तव्य काळातील दुर्मीळ छायाचित्रांचे प्रदर्शन भरविण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठाच्या गांधी अभ्यास केंद्राच्या वतीने दसरा चौकातील शाहू स्मारक भवनाच्या प्रदर्शनगृहात महात्मा गांधी यांच्या दक्षिण आफ्रिकेतील वास्तव्य काळातील दुर्मीळ छायाचित्रांचे प्रदर्शन पाहताना कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. भारती पाटील.

कुलगुरु डॉ. शिंदे यांनी प्रदर्शनाच्या संकल्पनेचे कौतुक केले. ते म्हणाले, या प्रदर्शनाच्या माध्यमातून मोहनदास करमचंद गांधी या बॅरिस्टर व्यक्तीचा महात्मा होण्यापर्यंतचा प्रवास कसा झाला, याची विलक्षण माहिती दर्शकास मिळते. आपल्याला माहिती असलेल्या गांधीजींपेक्षा एक वेगळे गांधी या प्रदर्शनातून आपल्याला दिसतात. हेच या प्रदर्शनाचे वैशिष्ट्य आहे.

या प्रदर्शनात दक्षिण आफ्रिकेतील वास्तव्य काळातील दुर्मीळ अशी २९ छायाचित्रे मांडण्यात आली आहेत. हे प्रदर्शन ६ ऑक्टोबरपर्यंत सकाळी ते रात्री ८ वाजेपर्यंत सुरू राहणार असून, त्याचा कोल्हापूरवासियांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन गांधी अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी याप्रसंगी केले.

यावेळी विद्यापीठाचे वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर, प्रा. किशोर बेडकीहाळ, अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, डॉ. पी. डी. राऊत, अधिसभा सदस्य संजय जाधव, समाजशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. जगन कराडे यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुण्यनगरी
2 OCT 2018

# महात्मा गांधींचे छायाचित्र प्रदर्शन प्रेरणादायी : कुलगुरू

## मोहनदास ते महात्मा प्रदर्शनाचा प्रारंभ

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
'मोहनदास ते महात्मा : गांधींचे दक्षिण आफ्रिकेतील वास्तव्य' या छायाचित्र प्रदर्शनामुळे इतिहासापासून वर्तमान उज्ज्वल करण्याची प्रेरणा आजच्या तरुणांना मिळेल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

महात्मा गांधी यांच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जयंती वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या गांधी अभ्यास केंद्राच्या वतीने शाहू स्मारक भवनाच्या कलादालनात या प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. त्यांच्या दक्षिण आफ्रिकेतील वास्तव्य काळातील दुर्मीळ छायाचित्रांचा समावेश



**कोल्हापूर : येथील शाहू स्मारक भवनात आयोजित कलाप्रदर्शन पाहताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व मान्यवर.**

आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थित होते.

यावेळी विद्यापीठाचे वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर, प्रा. किशोर बेडकीहाळ, अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. भारती पाटील, अधिसभा सदस्य संजय जाधव, समाजशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. जगन कराडे यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हे प्रदर्शन ६ ऑक्टोबरपर्यंत सकाळी १० ते रात्री ८ वाजेपर्यंत सुरू राहणार असून त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन गांधी अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी केले.

सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या गांधी अभ्यास केंद्रातर्फे दसरा चौकातील राजर्षी छत्रपती शाहू स्मारक भवन येथे आयोजित महात्मा गांधी यांच्या छायाचित्रांचे प्रदर्शन पाहताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.

# गांधी अभ्यास केंद्रातर्फे छायाचित्रांचे प्रदर्शन सुरू

**कोल्हापूर, ता. १ :** 'मोहनदास ते महात्मा गांधींचे दक्षिण आफ्रिकेतील वास्तव्य' छायाचित्र प्रदर्शनामुळे इतिहासापासून वर्तमान उज्ज्वल करण्याची प्रेरणा आजच्या तरुणांना मिळेल, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या गांधी अभ्यास केंद्रातर्फे दसरा चौकातील राजर्षी छत्रपती शाहू स्मारक भवनात महात्मा गांधी यांच्या छायाचित्र प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. गांधी यांच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जयंती वर्षानिमित्त त्याचे आयोजन केले. दक्षिण आफ्रिकेतील गांधीजींच्या वास्तव्य काळातील ही दुर्मीळ छायाचित्रे आहेत. प्र-कुलगुरू डॉ. शिर्के प्रमुख उपस्थित होते.

विद्यापीठाचे वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर, प्रा. किशोर बेडकीहाळ, अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, डॉ. पी. डी. राऊत, गांधी अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील, अधिसभा सदस्य संजय जाधव, डॉ. जगन कराडे उपस्थित होते.

प्रदर्शन ६ ऑक्टोबरपर्यंत सकाळी दहा ते रात्री आठपर्यंत सुरू राहणार असून त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन गांधी अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. पाटील यांनी केले आहे.

Kolhapur, Kolhapur-Today
02/10/2019 Page No. 2

पुढारी

# महात्मा गांधी यांचे छायाचित्र प्रदर्शन तरुणांसाठी प्रेरणादायी

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

'मोहनदास ते महात्मा : गांधींचे दक्षिण आफ्रिकेतील वास्तव्य' या छायाचित्र प्रदर्शनामुळे इतिहासापासून वर्तमान उज्ज्वल करण्याची प्रेरणा आजच्या तरुणांना मिळेल, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ गांधी अभ्यास केंद्रातर्फे शाहू स्मारक भवन येथे महात्मा गांधी यांच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जयंती वर्षानिमित्त त्यांच्या दक्षिण आफ्रिकेतील वास्तव्य काळातील दुर्मीळ छायाचित्रांचे प्रदर्शनाचे सोमवारी कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

डॉ. शिंदे म्हणाले, प्रदर्शनाच्या माध्यमातून मोहनदास करमचंद गांधी या बॅरिस्टर व्यक्तीचा महात्मा होण्यापर्यंतचा प्रवास कसा झाला याची माहिती मिळते. आपल्याला माहिती असलेल्या गांधीजींपेक्षा एक वेगळे गांधी या प्रदर्शनातून आपल्याला दिसतात.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, विद्यापीठाचे वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर, प्रा. किशोर बेडकीहाळ, अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. भारती पाटील, अधिसभा सदस्य संजय जाधव, समाजशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. जगन कराडे आदी उपस्थित होते. प्रदर्शन ६ ऑक्टोबरपर्यंत सकाळी १० ते रात्री ८ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे.

2 OCT 2018
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## गांधी अभ्यास केंद्राचा प्रकल्प : लोकवर्गणीतून उभारणार निधी : भारती पाटील

# शिवाजी विद्यापीठात साकारणार 'गांधी कुटी'

संतोष मिठारी ।
लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : महात्मा गांधी यांचा जीवनप्रवास आणि कार्याचा प्रचार, प्रसार करण्याच्या उद्देशाने शिवाजी विद्यापीठात 'गांधी कुटी' साकारण्यात येणार आहे. विद्यापीठातील गांधी अभ्यास केंद्राने हा प्रकल्प हाती घेतला आहे. येत्या वर्षभरात हा प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन या केंद्राने केले आहे.

या केंद्राने महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त विद्यापीठामध्ये 'गांधी कुटी' साकारण्याचा निर्णय घेतला आहे. एक एकर जागेमध्ये ही कुटी वर्धा आणि साबरमती आश्रम नजरेसमोर ठेवून उभारली जाणार आहे. त्यासाठी पारंपरिक साधने आणि साहित्याचा वापर केला जाईल. आधुनिक. साहित्य वापरले जाणार नाही. या कुटीमध्ये गांधीजी यांचा जीवनप्रवास, कार्यावर आधारित छायाचित्रे आणि पुस्तकांचे प्रदर्शन असणार आहे. अभ्यास केंद्राचे कार्यालय येथे राहणार आहे. कुटी साकारण्यासाठी सुमारे एक कोटी रुपयांचा खर्च येणार आहे. त्यासाठी लोकवर्गणीतून निधी उभारला जाणार आहे. ही कुटी कोल्हापूरची एक वेगळी ओळख निर्माण करणारी ठरेल.





### मदतीचा हात द्यावा

विद्यापीठात 'गांधी कुटी' उभारण्याचा उद्देश हा महात्मा गांधी यांचे जीवन, कार्य आणि त्यांच्या विचारांचा प्रसार करणे हा आहे. या प्रकल्पाचा प्राथमिक स्वरुपातील आराखडा विद्यापीठाला सादर केल्याचे गांधी अभ्यास केंद्राच्या समन्वयक प्रा. डॉ. भारती पाटील यांनी सांगितले. त्या म्हणाल्या, या प्रकल्पासाठी माझ्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे. लोकवर्गणीतून हा प्रकल्प पूर्ण केला जाणार असून दानशूर व्यक्ती, संस्थांनी यासाठी मदतीचा हात द्यावा. येत्या वर्षभरामध्ये ही कुटी साकारण्याचा विचार आहे.

### अभ्यास केंद्राची थोडक्यात ओळख

विद्यापीठात सन २000 मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (युजीसी) निधीतून गांधी अभ्यास केंद्र सुरु झाले. गेल्या सहा वर्षांपासून विद्यापीठाच्या निधीतून या केंद्राचे काम सुरु आहे. या केंद्रातर्फे पी. जी. डिप्लोमा इन गांधीयन स्टडीज्, पी. जी. डिप्लोमा इन रुरल डेव्हलपमेंट हे अभ्यासक्रम चालविले जातात. या अभ्यासक्रमांची एकूण विद्यार्थीसंख्या ६0 इतकी आहे. गांधीजी यांचे जीवन, विचार, कार्याच्या अनुषंगाने संशोधन केले जाते. विविध परिसंवाद, चर्चासत्रे, ज्येष्ठ विचारवंत, अभ्यासकांची व्याख्याने असे विविध उपक्रम वर्षभर राबविले जातात.

"'गांधी कुटी' साकारण्याबाबतचा प्राथमिक स्वरुपातील प्रस्ताव गांधी अभ्यास केंद्राने मांडला आहे. हा प्रस्ताव पाहून अधिकार मंडळांसमोर ठेवून पुढील कार्यवाही केली जाईल.

-डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरु

2 OCT 2018

महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गांधी विचारांची आजही तरुणाईला भुरळ

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर



महात्मा गांधी ही व्यक्ती नसून एक विचार आहेत, अशा शब्दांत महात्मा गांधी यांची ओळख नव्या पिढीला करून दिली जाते. गांधींचा विचार संशोधनाच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठाच्या महात्मा गांधी अध्यासनाद्वारे जपला जात आहे. स्वातंत्र्यानंतर पाऊणशे वर्षानंतर आणि गांधीजींच्या दीडशेव्या जयंतीवर्षात गांधी विचार आजच्या तरूणाईला खुणावत असल्याचे दिसून येत आहे.

सत्य आणि अहिंसा यांना आचार बनवा, भय आत्म्याला मारून टाकते, अविश्वास ही दुर्बलता आहे, सकारात्मता हा असा दृष्टीकोन आहे जो इतरांना देताना स्वतःमध्येही रूजत असतो, यासह अनेक प्रेरणादायी विचारधन महात्मा गांधींनी संपूर्ण जगाला दिले. सत्य व अहिंसेच्या मार्गाने सारे जीवन व्यतीत करणाऱ्या गांधीजींच्या प्रत्येक विचारामध्ये तत्वज्ञानाचा अंश आहे.

## यूजीसीने बंद केले, विद्यापीठाने सुरू ठेवले

विद्यापीठात पंडित नेहरू व डॉ. बाबासाहेब आंबडेकर यासह गांधी अध्यासन सुरू होते. त्यापैकी एक अध्यासन बंद करण्याचा आदेश युजीसीतर्फे विद्यापीठाला २०१३ साली देण्यात आला होता. यानुसार युजीसीने गांधी अध्यासनाला दरवर्षासाठी देण्यात येणारा १० लाख रूपयांचा निधी बंद केला. मात्र त्यानंतर विद्यापीठ प्रशासनाने स्वनिधीवर हे केंद्र सुरू ठेवले आहे. यासाठी विद्यापीठ प्रशासन गेल्या पाच वर्षांपासून दरवर्षी साडेतीन लाख रूपयांचे बजेट गांधी अध्यासन केंद्रासाठी देत आहे.

**युवकांपर्यंत गांधींजीचा विचार संशोधन व लेखनाच्या माध्यमातून पोहोचावा यासाठी गांधी अध्यासन केंद्रातर्फे विविध उपक्रम राबवले जातात. यासाठी अधिकाधिक युवक अध्यासनकेंद्राशी जोडले जावेत यादृष्टीने वर्षभरात काही प्रकल्पांची रचना करण्यात येणार आहे.**

– **डॉ. भारती पाटील**, समन्वयक, महात्मा गांधी अध्यासन केंद्र

## गांधीतत्वांचा जागर ...

महात्मा गांधी अध्यासन केंद्राच्यावतीने पदव्युत्तर पातळीवर सध्या दोन पदविका अभ्यासक्रम शिकवले जातात. यासाठी ६० विद्यार्थी क्षमता आहे. गेल्या १७ वर्षात या केंद्राच्यावतीने ५० हून अधिक कार्यशाळा, १५ हून अधिक परिषद यासह व्याख्याने, चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. गांधीतत्वांचा जागर करणाऱ्या १२ पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले आहे. सध्या 'गांधी पश्चात गांधी विचारांचे समाजातील स्थान' या विषयावर सखोल संशोधन प्रकल्पाचे काम सुरू आहे.

## अध्यासनातर्फे १२ पुस्तकांचे प्रकाशन

गांधी जयंती विशेष

दहाव्या पंचवार्षिक योजनेंतर्गत युजीसीने महापुरूषांच्या विचारकार्यांच्या संशोधन आणि प्रसारासाठी विविध अभ्यास केंद्रांना मान्यता दिली. त्यानुसार शिवाजी विद्यापीठात २००० मध्ये महात्मा गांधी अध्यासनाची स्थापना झाली. समाजाला दिशा देण्यासाठी गांधीजींच्या विचारांचा वापर संशोधनासाठी तसेच नव्या पुस्तक लेखनासाठी व्हावा या हेतूने अध्यासनाची स्थापना झाली. या अध्यासनाच्या माध्यमातून गांधी विचारांचा अभ्यास करणे, त्यातून संशोधन करणे, पुस्तकांची निर्मिती करणे, संशोधनासाठी शिष्यवृत्ती देणे यासारख्या योजना युजीसीच्या आर्थिक मदतीने सुरू झाल्या. गेल्या १७ वर्षांत दीड हजार विद्यार्थ्यांनी गांधी अध्यासनाद्वारे संशोधन केले आहे. यामध्ये स्वातंत्रपूर्व काळातील गांधीजींच्या व्यक्तिमत्वापासून स्वातंत्र्यकाळ व त्यानंतरच्या काळात केलेल्या चळवळी, आंदोलने, सत्याग्रह याबाबत त्यांच्या वैचारीक तत्वांचा अभ्यास संशोधनामध्ये करण्यात आला आहे. सुरूवातीच्या काही वर्षांत गांधी अध्यासन केंद्रात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये अध्यापक क्षेत्रातील व्यक्तींचा समावेश होता. मात्र गेल्या चार ते पाच वर्षात तिशीतील युवकांचा ओढा काही प्रमाणात वाढला आहे.

सकाळ

# 'अल्झायमर'वर आंतरराष्ट्रीय संशोधन

## शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. सोनवणे, सागर बरालेंचे निबंध सादरीकरण

अमोल सावंत : सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १ : अल्झायमर (स्मृतिभ्रंश) हा विकार शक्यतो वृद्धांमध्ये आढळतो. विसरभोळेपणा, भ्रमकता आदींचा यामध्ये समावेश आहे. याचा स्मरणशक्तीवर खूप परिणाम होतो. म्हणूनच जगभरातील अनेक संशोधन संस्था, विश्वविद्यालयातील वैज्ञानिक अन् डॉक्टर्स सातत्याने संशोधन करत आहेत. विशेष म्हणजे शिवाजी विद्यापीठातील जीव-रसायनशास्त्र विभागातील प्रा. डॉ. के. डी. सोनवणे, सागर बराले आणि सहकारी यांचे ॲमिलॉईड हायपोथेसिसवर आंतरराष्ट्रीय स्तरावर संशोधन करत आहेत.

डॉ. सोनवणे, श्री. बराले यांनी जागतिक पातळीवरील न्यूरोपेप्टाईड्स, अमायनो ॲसिडस्, आरएससी ॲडव्हान्स जर्नल ऑफ मॉलेक्युलर मायक्रोबायोलॉजी अँड बायोटेक्नॉलॉजी, दि प्रोटीन जर्नल, कॉम्प्युटर इन बायोलॉजी अँड मेडिसीन, प्रोटिन अँड पेप्टाईड लेटर्स, मॉलेक्युलर बायोसिस्टम्स् या नियतकालिकांमध्ये संशोधन प्रसिद्ध झाले आहे. डॉ. सोनवणे, श्री. बराले यांचे जुलै ते सप्टेंबर २०१५ च्या न्यूरोपेप्टाईड्स् नियतकालिकांत टॉप २५ हॉटेस्ट आर्टिकल्सचा समावेश आहे.


### वडणगेच्या बरालेंची भरारी

**वडणगे (ता. करवीर) येथील सागर बराले यांनी एमएस्सी पूर्ण केली असून, सध्या ते डॉ. सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएचडी करत आहेत. अल्झायमर रोगावरील संशोधनासाठी ते अडीच वर्षे काम करत आहेत. ते सामान्य कुटुंबातील आहेत. वडील शिवाजी बराले हे प्रसिद्ध सुतार असून टिंबर मार्केट येथे काम करतात.**




याबाबत डॉ. सोनवणे म्हणाले, ''अल्झायमरमध्ये कोलीनर्जीक, ताऊ, ॲमिलॉईड हायपोथेसिसचा समावेश आहे. ॲमिलॉईड हायपोथेसिसमध्ये ४० किंवा ४२ अमायनो आम्ल असणारे ॲमिलॉईड बिटा पेप्टाईड हे प्रथिन कारणीभूत ठरते. हे प्रथिन जर जास्त संख्येने एकत्र आल्यास त्यांचे ॲमिलॉईड बिटा प्लेक्सचे जाळे मेंदूमध्ये तयार होते. त्यामुळे मेंदूमधून वाहणाऱ्या संवेदनांची देवाण-घेवाण करण्याचे कार्य सुरळीत होत नाही.''

डॉ. सोनवणे, श्री. बराले आणि सहकाऱ्यांनी ॲमिलॉईड बिटा पेप्टाईडस् यांना तोडणारी काही वितंचके (एन्झाईमस्) यावर संशोधन करून त्यांची कार्य करण्याची पद्धती प्रसिद्ध केली. तसेच सूक्ष्मजीवांमधून अशा प्रकारच्या नवीन वितंचकांचाही शोध लावला. ड्रग डिझाईनच्या माध्यमातून ॲमिलॉईड बीटा पेप्टाईडस् यांना एकत्रित करण्यापासून रोखणारी लहान प्रथिने किंवा नवीन औषधे शोधण्याचे काम जीव-रसायनशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र विभागातर्फे युद्धपातळीवर सुरू आहे. डॉ. सोनवणे, श्री. बराले, सागर बर्गे, मारुती धनवडे, चिदंबर जलकुटे, सुबोध कांबळे, संगणक केंद्रातील सर्व सहकाऱ्यांना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. डी. टी. शिर्के यांचे सहकार्य लाभले.



डॉ. सोनवणे



सागर बराले

2 OCT 2018

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**शिवाजी विद्यापीठातील सर्जनशीलता :** विद्युत उपकरणे बंद करणे, आग , चोर आल्याची माहिती मिळणार

# विद्यार्थ्यांनी बनविले 'स्मार्ट होम' ॲप

प्रदीप शिंदे ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** मोबाईलशिवाय राहणे अनेकांना असह्य झाले झाले असताना, मोबाईल हे सोईच्या गोष्टींसाठी आहेत, हेच सिद्ध करण्यासाठी शिवाजी विद्यापीठातील संगणकशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी स्मार्टफोनचा विधायक वापर करीत 'स्मार्ट होम' हे मोबाईल ॲप तयार केले आहे. या ॲपद्वारे घरातील विद्युत उपकरणे बंद करण्यासह घराला आग लागली व चोर आल्याची कल्पना संबंधित व्यक्तींना मिळणार आहे.

तंत्रज्ञानाने माणसाचे आयुष्य सोपे केले; पण माणूस त्याचा अतिवापर, अतिरेक करीत असेल तर तो तंत्रज्ञानाचा दोष नाही. याच तंत्रज्ञानातील मोबाईल हा महत्त्वपूर्ण घटक आहे. नाण्याच्या दोन बाजूंप्रमाणे मोबाईलच्या वापरालाही दोन बाजू आहेत; हीच गोष्ट या संगणकशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी सिद्ध करून दाखविली आहे.

धावपळीच्या युगात आपण परगावी गेल्यानंतर नजरचुकीने घरातील लाईट, टीव्ही, फ्रीज, म्युझिक सिस्टीम बंद करण्याचे विसरतो. यासोबत घराला आग लागली तर कशी समजेल, घरात चोर आल्यास कसे समजेल हा प्रश्न शिवाजी विद्यापीठातील एम. सी. ए. व एम. एससी. विभागातील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पडला. त्यांनी या सर्व गोष्टींचा विचार करून 'स्मार्ट होम' हे ॲप तयार केले आहे.

**स्मार्ट ॲपचा फायदा :** घरामधून बाहेर असताना घरातील विद्युत उपकरणे बंद करण्याचे विसरलो तर त्याची माहिती या ॲपद्वारे समजणार आहे. ॲपद्वारे हे विद्युत उपकरणे बंद करता येणार आहेत. यामुळे विजेची बचत होणार आहे. यासह घरामध्ये आग लागल्यानंतर फायर ऑटोमेशनद्वारे ॲपवर तत्काळ माहिती मिळणार आहे. त्यासह घरातून बाहेर असताना चोर आल्यास तत्काळ आपल्या ॲपवर कॉल येणार आहे. यासाठी घरातील चार व्यक्तींचे मोबाईल नंबर नोंदविता येणार आहेत. त्यांची माहिती आपल्याला या ॲपवर कळणार आहे.



शिवाजी विद्यापीठातील संगणकशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या स्मार्ट होम ॲपसोबत प्रा. प्रसन्न करमरकर.

## यांचा आहे सहभाग

मुरली उत्तम जाधव, कुणाल संभाजी खोत, हृषीकेश अमोल अडके (तिघेही एमसीए भाग - तीन), रोहित शिवाजी आडनाईक, अजय तानाजी माने, पुष्कर कणंगलेकर (एम.एस्सी. संगणकशास्त्र भाग दोन) या विद्यार्थ्यांनी हे ॲप विकसित केले आहे. साधारणपणे एक बीएचके प्लॉटसाठी त्यांना २५00 ते ३000 रुपयांपर्यंत खर्च आलेला आहे. हा प्रोजेक्ट अँड्रॉइड मोबाईलला सपोर्ट करतो. एम्बइडेड सी आणि जावा प्रोग्रामिंगचा यात वापर केला आहे. आर्डिनो या उपकरणाचाही वापर केला आहे. हा प्रोजेक्ट ॲमेझॉन अलेक्सा आणि गुगल होमला सपोर्ट करतो. यात इलेक्ट्रॉनिक सेन्सर वापरला आहे. ॲपची साईज एक ते दोन एमबी आहे. लवकरच हे ॲप प्लेस्टोअरवर उपलब्ध करण्यासाठी आम्ही प्रयत्न करीत असल्याचे या विद्यार्थ्यांनी सांगितले.

विजेची मोठ्या प्रमाणात टंचाई भासू लागली आहे. ही वीज बचत करण्यासाठी हे ॲप अत्यंत उपयुक्त आहे. वीजबचतीसह घरातील सुरक्षिततेसाठी हे ॲप खूप मदत करते. लवकरच ॲप प्ले स्टोअर येण्यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत. विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय विज्ञान स्पर्धेत हा प्रयोग सादर केला होता. त्याला प्रथम क्रमांक मिळाला आहे.

– **प्रा. प्रसन्न करमरकर,**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ

सकाळ

# शिक्षण घेता घेताच कमाई

## हिंदी विभागातील उपक्रम ; स्काईप व भाषांतरातून उत्पन्न





कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील हिंदी विभागात भाषांतर करण्यात मग्न असलेले विद्यार्थी.

> भाषांतर, अंकीकरण, चित्रांकन, लिप्यंतरण, उपशीर्षक, पाठ परिवर्तन, धृती भंडारण, धृती संचयनिर्मिती, स्थानीकरण प्रकारची कौशल्ये हिंदी विभागातील विद्यार्थी आत्मसात करत आहेत. यात भाषांतराची मुख्य भूमिका आहे. संगणक, इंटरनेट, विविध सॉफ्टवेअर हाताळणी आवश्यक असते.
> – प्रा. डॉ. पद्मा पाटील, विभागप्रमुख

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १ : शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागातील विद्यार्थी स्काईप व आयटी कंपन्यांची भाषांतराची कामे मिळवून शिकता शिकता कमाई करत आहेत. ही कमाई महिन्याकाठी १० ते १५ हजार रुपये इतकी नक्कीच नाही. थेट ५० ते ५५ हजार रुपयांच्या वेतनाइतकी आहे. विशेष म्हणजे 'सी डॅक'च्या माध्यमातून (पुणे) हिंदी विभागाने स्काईपवरील भाषांतराचे हाती घेतलेले काम देशातील विद्यापीठ स्तरावर पहिलेच ठरले आहे.

हिंदी विभागातील एम. ए. व भाषा प्रौद्योगिकी, हिंदी अनुवाद पदविका व भारतीय भाषा सॉफ्टवेअर्स अनुप्रयोग अभ्यासक्रमांकडील सर्व विद्यार्थी स्काईपच्या माध्यमातून सी-डॅकबरोबर भाषांतर कार्यात संलग्न आहेत. ते केंद्राच्या 'गो ट्रान्सलेट' व 'लोकलायझेशन' कार्यात सहभागी आहेत. केंद्राबरोबर हिंदी विभागाच्या संगणक प्रयोगशाळेत स्काईपद्वारे संपर्क केला जातो.

विभागप्रमुख प्रा. डॉ. पद्मा पाटील ऑनलाईन सत्राच्या समन्वयक म्हणून काम पाहत असून, सी डॅकमधील तज्ज्ञ विभागप्रमुखांतर्फे विद्यार्थ्यांना गो ट्रान्सलेट व लोकलायझेशनमधील काम करण्यासाठी यूजर आयडी व पासवर्ड देऊन काम करण्यास मार्गदर्शन केले जात आहे.

विद्यार्थी इंग्रजीतून हिंदी, मराठी, कन्नड व तेलगू या भाषांमध्ये ऑनलाईन भाषांतर करत आहेत. भाषांतर व संगणक कौशल्य यांच्या विकासाबरोबरच विद्यार्थ्यांना स्वयंरोजगार उपलब्ध झाला आहे. काही विद्यार्थ्यांना आयटी कंपन्यांकडील (सीडॅक, प्रोझ.कॉम, एमटीबी, ट्रान्सलेशन वेस इ.) भाषांतराचे काम मिळाले असून त्यांना ५०,००० ते ५५,००० हजार रुपये वेतन मिळत आहे. हिंदीतील काही साहित्यकृतींचे मराठी, कन्नड, तेलगू भाषांमध्ये व या भाषांमधून हिंदीमधील भाषांतरे चालू आहेत.

डॉ. पद्मा पाटील यांनी ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त साहित्यकारांच्या रचनांची मराठी भाषांतरे प्रकाशित झाली आहेत. 'गुरुदयाल सिंह' यांच्या 'मढी का दीवा' कादंबरीचे 'भेटी लागी जीवा', कुंवर नारायण यांच्या 'आत्मजयी' खंडकाव्य, तर डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या वैचारिक ग्रंथाचे 'वैदिक धर्मसूत्र तथा बहुजनों की गुलामी' नावाच्या हिंदी भाषांतराची द्वितीय आवृत्ती आली आहे.

प्रा. डॉ. जयसिंगराव पवार यांच्या 'राजर्षी शाहू स्मारक' ग्रंथाचे हिंदी भाषांतर 'राजर्षी शाहू छत्रपती : एक समाज क्रांतिकारी राजा' नावाने प्रकाशित झाले आहे.

सकाळ

# युवा संसद स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाला पुरस्कार

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १ : राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेत यंदा प्रथमच राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार प्राप्त करून संघातील विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाचा लौकिक उंचावला, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. राष्ट्रीय पुरस्कार वितरण समारंभात प्रदान करण्यात आलेल्या ट्रॉफीसह संघाने कुलगुरू डॉ. शिंदे यांची भेट घेतली. त्यावेळी ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित होते.

डॉ. शिंदे यांनी संघाचे समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांच्यासह सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे स्पर्धेतील चमकदार कामगिरीबद्दल अभिनंदन केले.

उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या आठ विद्यार्थ्यांना 'बेस्ट परफॉर्मन्स प्राईझ विनर' पुरस्कार जाहीर झाला होता. या १४व्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ नुकताच नवी दिल्ली येथील भारतीय संसद भवनाच्या बालयोगी सभागृहात पार पडला. संसदीय कामकाज राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांच्या हस्ते हा पारितोषिक वितरण समारंभ झाला. स्पर्धेत देशभरातून एकूण ७४ संघ सहभागी झाले. शिवाजी विद्यापीठाच्या संघाने पश्चिम विभागात सर्वोत्कृष्ट कामगिरी बजावून राष्ट्रीय स्पर्धेपर्यंत झेप घेतली होती. विभागीय सांघिक पारितोषिकासह संघातील निकिता पिसे, अभिजीत ताम्हणकर, शैलेश पिले, श्रेयश मोहिते, विनायक साळुंखे, गौरी काटे, हेरंब सावंत व आकांक्षा पाटील या आठ विद्यार्थ्यांना बेस्ट परफॉर्मन्स पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांना समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांचे मार्गदर्शन मिळाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 OCT 2018
Times of India

# SUK invites ideas for painting its compound wall

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has invited proposals for painting the compound walls on its sprawling 800-acre campus. The last date to submit the proposal is October 8.

The varsity, two days ago, invited ideas from interested citizens, students, and officials for its 2-km-long compound wall. The public notice from the varsity said that participants will have to share their ideas on an A-3 paper by October 8.

"The themes could be arts, sports, culture, environment, travel and tourism, cleanliness, social slogans. The selected themes will be felicitated by the varsity," the notice added.

D T Shirke, SUK pro-VC, told **TOI**, "At present, the compound wall is in a dead state. We want to make it live again with participation from the citizens. We also conducted a meeting with the architecture college, fine arts college officials few days agoa and received a positive response from them."

**The public notice from the varsity said that participants will have to share their ideas on an A-3 paper by October 8**

Being asked about funding for the project, Shirke said they will look for sponsors for the activity. "We want theme-based paintings on the compound wall. There are so many issues, which can be fantastically shown via paintings. Imagine the paintings from the students associated with fine arts showing their skills on such large canvas," he said.

When asked if there is any deadline, Shirke said that as such there is no deadline to complete this task, but they are eyeing it to complete before November 18 i.e. SUK's foundation day.

"We are excited to launch this activity and hopefully we will get a positive response. The wall will attract lot of attention from travellers. Hence, it could prove to be a very important step," he said.

2 OCT 2018
Times of India

# Over 300 NSS students clean CSMT

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The National Service Scheme (NSS) students of Shivaji University, Kolhapur (SUK) participated in a cleanliness activity on Monday at the city-based Chhatrapati Shahu Maharaj Terminus (CSMT).

According to SUK officials, as many as 300 students associated with the NSS along with the varsity officials, including university advisor D R More, registrar Vilas Nandavadekar and NSS coordinator D K Gaikwad were present for the drive.

"We conducted the cleanliness drive for more than three hours in which more than 2 tonne of waste was collected. The excited bunch of participants started the activity at 8am on the station premises. Apart from cleanliness, the students also performed street play on the importance of cleanliness in public places at the different areas of the station," Gaikwad said.

Nandavadekar said that earlier last week, the students were also engaged in cleanliness of Mahalaxmi temple premises. "On October 2 (Tuesday), we have planned cleanliness activity on the SUK premises for which we are seeking active participation from the citizens, students, varsity authorities and faculty members," he said.

2 OCT 2018

महाराष्ट्र टाईम्स

# विद्यापीठात पथसंचलन

**कोल्हापूर :** येथील शिवाजी विद्यापीठातील एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी सर्जिकल स्ट्राईक डेनिमित्त पथसंचलन केले. यावेळी मेजर डॉ. अशोक डोनर, मेजर राजेंद्र खर्से, महेश शिंगे, सुहास कांबळे, अविनाश कारंडे, बी. आर. भुजुगडे यांच्यासह विद्यार्थी सहभागी झाले होते. संचलन झाल्यानंतर कर्नल उदय बारावकर, कर्नल मानस चौधरी यांनी मार्गदर्शन केले.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 OCT 2018
लोकमत

# विद्यार्थ्यांनी वैयक्तिक क्षमता विकासावर भर द्यावा

## आवटी : शिवाजी विद्यापीठातील परिसंवाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी वैयक्तिक क्षमतेच्या विकासावर भर दिला पाहिजे, असे प्रतिपादन प्रेरणादायी वक्ते दिलीप आवटी यांनी शिवाजी विद्यापीठात केले.

विद्यापीठातील सेंट्रल प्लेसमेंट सेल आणि तंत्रज्ञान अधिविभागातर्फे बुधवारी आयोजित परिसंवादात ते बोलत होते. प्रेरणादायी वक्ते आवटी म्हणाले, विद्यार्थी दशेतून समाजक्षेत्रात कार्य करताना अनेक समस्या येऊ शकतात. या समस्यांविषयी जागरूक असणे गरजेचे आहे. आत्म कार्यक्षमतेवर विश्वास ठेऊन अशा समस्यांना सामोरे जाणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी आयुष्यात ध्येय प्राप्तीसाठी केंद्रित असले पाहिजे. नवीन संधीच्या शोधात सतत झटले पाहिजे. तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी म्हणाले, टेक्निकल कॉलेज म्हणजे सर्व काही नव्हे, तर स्वतःची जडणघडण आणि वैविध्यपूर्ण कौशल्ये विद्यार्थ्यांनी आत्मसात केली पाहिजेत. या कार्यक्रमास धीरज पाटील यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. तंत्रज्ञान अधिविभागाचे प्लेसमेंट सेलप्रमुख डॉ. एस. बी. सादळे यांनी प्रास्ताविक केले. सेंट्रल प्लेसमेंट सेलचे समन्वयक डॉ. जी. एस. राशीनकर यांनी आभार मानले.

पुढारी

# 'विद्यार्थी सशक्तीकरण' परिसंवाद

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठ सेंट्रल प्लेसमेंट सेल व तंत्रज्ञान अधिविभागाच्या संयुक्त विद्यमाने 'विद्यार्थी सशक्तीकरण' विषयावर परिसंवाद झाला. दिलीप अवटी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, विद्यार्थ्यांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी वैयक्तिक क्षमतेच्या विकासावर भर दिला पाहिजे. विद्यार्थीदशेतून सामाजिक काम करताना येणाऱ्या समस्यांविषयी जागरूक राहावे. तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी यांनी मार्गदर्शन केले. तंत्रज्ञान अधिविभागाचे प्लेसमेंट सेलप्रमुख डॉ.एस.बी.सादळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. जी.एस. राशिनकर यांनी आभार मानले.